॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव दि. 2 (          ) जैवशास्त्रातील नवे बदल लक्षात घेवून संशोधकांनी चिकित्सात्मक विश्लेषण आणि संशोधनावर भर द्यावा असे आवाहन मदुराई कामराज विद्यापीठातील प्रा.के.मनोहरन यांनी केले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जैवशास्त्र प्रशाळेच्या वतीने आज पासून जैवशास्त्र प्रशाळेतील सद्यस्थितीतील प्रवाह या विषयावर चर्चासत्राला प्रारंभ झाला. त्यावेळी प्रा.मनोहरन बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील होते. यावेळी मंचावर भारतीय कृषि संशोधन संस्था नवी दिल्लीचे प्रा.ओ.एन.तिवारी, प्रशाळेचे संचालक प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्रा.किशोर विश्वकर्मा उपस्थित होते.

यावेळी बोलतांना प्रा.मनोहरन यांनी जैवशास्त्रात होत असलेल्या नवीन बदलांची माहिती दिली. हा विषय आनंददायी असून विद्यार्थ्यांनी त्यामध्ये रस घेवून संशोधनाचे काम करावे. पारंपारिक संशोधन न करता नवे विषय हाती घ्यावे. विश्लेषणात्मक दृष्टी बाळगावी. उपकरणांवर आधारीत संशोधन करावे असेही आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरुंनी या प्रशाळेचा उद्योग विश्वाशी संवाद असून त्यामुळे नाविन्यपूर्ण संशोधन होत असते. असे मत व्यक्त करून या चर्चासत्राचा विद्यार्थ्यांना निश्चितच मोठा फायदा होईल असा विश्वास व्यक्त केला. यावेळी प्रा.तिवारी यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ.प्रविण पुराणिक यांनी प्रास्ताविक केले. प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी प्रशाळे विषयी आणि जैवशास्त्र विषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नेहा बाविस्कर या विद्यार्थिनीने केले. प्रा.किशोर विश्वकर्मा यांनी आभार मानले. उद्या शनिवार दिनांक 3 फेब्रुवारी रोजी या चर्चासत्राचा समारोप होणार आहे.

---

उमवि/16/ हस्तदेय/ 2018 दिनांक : 2 फेब्रुवारी, 2018

प्रति,
मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत //--
( सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी